नियमित फौजदारी खटला क्र. ६८/२०२१

नि. क्र.६७

**(सदर साक्षीदाराची साक्ष व्ही. सी. द्वारे घेण्यात येत आहे.)**

**<u>सरकारतर्फे  साक्षीदार क्रमांक  –८  मी शपथपूर्वक सांगतो कि –</u>**

**माझे नाव –**   योगेश अशोक जाधव

**वय** –  ४५ वर्षे  **हुद्दा–**  सहाय्यक पोलिस निरीक्षक

**नेमणुक –** आर्थिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. जी. एन. पाटोळे यांचेतर्फे –</u>**

१.  दि.२८/२/२०२१ रोजी मी सावंतवाडी पोलिस ठाणे येथे सहाय्यक पोलिस निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. पोलिस हवालदार धुरी यांनी गु. र.क्र. ३६/२०२१ हा दाखल केला  होता व त्याचे तपासकाम माझ्याकडे सोपवण्यात आले होते. त्यावेळी गुन्ह्याची प्रथम खबर अहवाल, जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्र प्राप्त झाले. दिनांक १/३/२०२१ रोजी मी घटनास्थळाचा पंचनामा केला.  घटनास्थळी साक्षीदार कृष्णा पाखरे यांनी एक कटावणी वजा लोखंडी रॉड काढून दिला. तो पंचांसमक्ष पंचनामा करुन जप्त केला. घटनास्थळ हे आंबोली जकातवाडी याठिकाणी होते. घटनास्थळावर असलेले चिऱ्याचे बांधकाम लोखंडी रॉडच्या सहाय्याने आरोपीने पाडले होते. पाडलेल्या बांधकामाचे दगड फिर्यादीच्या बोलेरो गाडीच्या बंपरवर पडलेले दिसले. त्यामुळे सदर गाडीच्या बंपरचे नुकसान झाले होते. घटनास्थळाचे फोटो काढले.  सदरचे फोटो पोलिस नाईक श्री. शिंदे यांच्या मोबाईलमध्ये काढण्यात आले होते. सदर फोटोंची पोलिस स्टेशनमधून प्रिंट काढली. त्याबाबतचे भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र जोडले आहे. त्यावर पोलिस नाईक श्री. शिंदे यांची सही आहे. त्यांची सही मी ओळखतो. त्यातील मजकुर  खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. ६८</u>** देण्यात येत आहे. घटनास्थळाच्या फोटोंना **<u>आर्टीकल १ ते ४</u>** देण्यात येत आहे. जप्त कटावणी वजा लोखंडी रॉड दाखविल्यास

मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला लोखंडी रॉड आर्टीकल 'अ' हा तोच आहे. आता मला नि. ४५ कडील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर आम्ही सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ ते ३ यांना अटक केली. आता मला आरोपींचे अटक पंचनामे दाखविण्यात आले ते तेच आहेत. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>अनुक्रमे निशाणी ६९ ते ७१</u>** देणेत येत आहेत. त्यानंतर साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी यांना जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता पत्र दिले. उर्वरित आरोपींना नोटीस दिली. त्यानंतर साक्षीदार रहात असलेल्या घराचा असेसमेंट उतारा प्राप्त केला. आता मला दाखविण्यात आलेले असेसमेंट उतारे हे तेच आहे. त्यावर आंबोली ग्रामपंचायतीचा सही शिक्का आहे. त्यास **<u>अनुक्रमे नि. ७२ व ७३</u>** देण्यात येत आहेत. सदर उताऱ्यावर गीता पाखरे व कृष्णा पाखरे यांच्या नांवाची नोंद आहे. त्यानंतर आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपींना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाहीत.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. डी. व्ही. ठाकुर यांचेतर्फे –</u>

२. तपासा दरम्यान मी फिर्यादीला दिनांक २८/२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता पोलिस स्टेशनमध्ये भेटलो होतो. फिर्यादीने घटनेवेळी परिधान केलेले कपडे घातले आहेत किंवा कसे याबाबत मी चौकशी केली नाही. दिनांक १/३/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता मी घटनास्थळी गेलो. घटनास्थळावरील जमीन कोणाच्या मालकीची आहे त्याबाबत मी कागदपत्र जप्त केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी

घटनास्थळावरुन चिऱ्याचे दगड, बेलेरो गाडी, मोबाईल व इतर साहित्य जप्त केले नाही. ज्या मोबाईलमध्ये फोटो काढले तो मोबाईल श्री. शिंदे यांच्याच ताब्यात व नियंत्रणात आहे. हे म्हणणे खरे आहे की, तपासा दरम्यान आरोपी व फिर्यादीमध्ये यांच्यामध्ये जमिन जागेवरुन वाद असल्याचे निष्पन्न झाले आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे तपासकाम करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही–
(जे.एम.मिस्त्री)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ सावंतवाडी.

दि. ०७/०४/२०२६